:: प्रेसनोट ::

रत्नागिरी जिल्हा पोलीस दलातर्फे पोलीस अधीक्षक कार्यालय, रत्नागिरी येथे नागरीकांसाठी ऑनलाईन सेवा केंद्राचे (**KIOSK** सेंटर) उद्‌घाटन सोहळा कार्यक्रम दि. १८/१०/२०१७ रोजी सकाळी ११.०० वा. श्री. सुभाष निळकंठ सावंत, माजी सैनिक, रा. मिऱ्या, रत्नागिरी यांचे शुभहस्ते संपन्न झाला. उद्‌घाटन कार्यक्रमाकरीता श्री. प्रणय अशोक, पोलीस अधीक्षक, श्री. मितेश घट्टे, अपर पोलीस अधीक्षक, श्री. महादेव वावळे, पोलीस उपअधीक्षक (मुख्या.), श्री. मारुती जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी लांजा, श्री. गणेश इंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी रत्नागिरी, श्री. व्हनमाने, उपविभागीय पोलीस अधिकारी खेड, श्रीमती शीतल जानवे, उपविभागीय पोलीस अधिकारी चिपळूण व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सिटीझन पोर्टलचे माध्यमातून केंद्र शासनाचे ई-गर्व्हनन्स सीसीटीएनएस प्रकल्पातंर्गत राज्यातील पोलीसांच्या कामात सुधारणा करण्याच्या उद्देशाने गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी संपूर्ण देशाला संगणकाद्वारे एकत्र आणण्याची योजना आखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. नागरिकांना कमी वेळेत ऑनलाईन सिटीजन पोर्टलच्या माध्यमातून विविध प्रकारची परवाने प्राप्त करणे व ई-तक्रारीकरीता वापर करणे याकरीता उपयोग करावा असे आवाहन श्री. प्रणय अशोक, पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांनी केलेले आहे.

## सिटीजन पोर्टल वरुन ऑनलाईन अर्ज करण्यासाठी नागरिकांनी करावयाची कार्यपध्दती.

- प्रथम नागरिकांनी **http://www.mhpolice.maharashtra.gov.in/Citizen/Login.aspx** या संकेतस्थळास भेट देणे.
- नागरिकांनी वरील संकेतस्थळास भेट दिल्यानंतर **Create Citizen Login** या पर्यायावर क्लिक करुन आपली वैयक्तिक माहिती कॉलमप्रमाणे नोंदवून आपले युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करुन घ्यावी.
- पुन्हा **http://www.mhpolice.maharashtra.gov.in/Citizen/Login.aspx** या संकेतस्थळावर जावून युजर आयडी व पासवर्डचा वापर करुन लॉगीन करावे.
- त्यानंतर डेस्कटॉपवरील होमपेज ओपन होईल. त्यामधील नागरिकांसाठी सेवा या मोडयुलवर जाऊन “सार्वजनिक नवरात्रोत्सव/गणेशोत्सव परवानगी” या पर्यायावर क्लिक करावे.
- त्यानंतर दिलेल्या कॉलमप्रमाणे माहिती नोंद करुन सदरचा अर्ज “सादर” “(**Submit**)” करावा. त्यानंतर पोलीस ठाणेस आपला अर्ज प्राप्त झाल्यानंतर आपले मंडळास भेट देण्यासाठी नोंदविण्यात आलेल्या मोबाईल क्रमांकावर मेसेज येईल.
- त्यानंतर संबधीत पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी/कर्मचारी आपले मंडळास भेट देतील.
- मंडळास भेट दिल्यानंतर संबधीत पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी परवाना देण्याबाबत ठरवतील.
- त्याबाबत संबधीत मंडळाचे पदाधिकारी यांचे नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर मेसेज येईल.
- त्यानंतर संबधीत मंडळाचे पदाधिकारी यांनी पोलीस ठाणेस भेट देवून परवाना प्राप्त करुन घ्यावी.